**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार, दिनांक ०६ जुलै २०२४**

**ठळक बातम्या**

1. **येत्या काळात वाहन उद्योगातील उलाढाल ५० लाख कोटींवर पोहचविण्याचा प्रयत्न - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन.**
2. **देशांतर्गत बाजारात कांद्याची पुरेशी उपलब्धता असल्याची केंद्र सरकारची ग्वाही.**
3. **नागपूरच्या दीक्षाभूमीबाबत जनभावना आणि आस्था यांचा ताळमेळ ठेवून सरकारनं काम करावं - काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा सल्ला.**
4. **१५ व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीचा २०२४ चा सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार महाराष्ट्राला जाहीर.**

****

होरिबा

वाहन उद्योगाच्या क्षेत्रात जपाननं चांगली प्रगती केली आहे. मात्र, गेल्या दहा वर्षांत भारतानं जपानला मागे टाकलं असून भारतातील वाहन उद्योगातील उलाढाल ७ लाख कोटींवरून २० लाख कोटींवर पोहचली आहे. येत्या काळात ही उलाढाल ५० लाख कोटींवर पोहचविण्याचा प्रयत्न आहे, असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. नागपुरातील बुटीबोरी एमआयडीसी येथे होरिबा कंपनीच्या वैद्यकीय उपकरण आणि कंज्युमेबल्स (रिएजंटस) उत्पादन प्रकल्पाचं उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते झालं. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, होरिबा लिमिटेडचे चेअरमन आणि समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अत्सुशी होरिबा, होरिबा इंडियाचे चेअरमन डॉ. जय हाकू, होरिबा इंडियाचे अध्यक्ष डॉ. राजीव गौतम यांची उपस्थिती होती. गडकरी म्हणाले की 'विदर्भ हा आर्थिक, सामाजिकदृष्ट्या मागास भाग आहे. त्यामुळे या

भागाच्या विकासासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. येथील गरिबी हटविण्यासाठी रोजगार निर्मिती आवश्यक आहे. सेमी कंडक्टरचा प्रकल्प आल्यास नक्कीच रोजगार निर्मिती होईल.' बुटीबोरी येथे ऑटोमोबाइल मॅन्युफॅक्चरिंग युनिट सुरू होण्याची गरज आहे, असंही ते म्हणाले. भारतातून जवळपास ४० हजार कोटींची निर्यात सुरू असल्याचाही त्यांनी उल्लेख केला.

वेदिक

'वेदिक'च्या वतीनं स्थानिक युवकांच्या कौशल्य विकासासाठी स्थापित करण्यात आलेल्या वेदिक महिंद्रा कौशल्य विकास केंद्राचं उद्घाटन उद्या केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटन सोहळा सकाळी 11:30 वाजता डिफेन्स पोस्ट ऑफिसजवळ, ऑर्डिनन्स फॅक्टरी अंबाझरी परिसर, नागपूर इथं होणार आहे. विदर्भ डिफेन्स इंडस्ट्रीज असोसिएशन, महिंद्रा ट्रॅक्टर्स, यंत्र इंडिया लिमिटेड यांच्या प्रयत्नांनी आणि राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (एनएसडीसी) च्या पाठिंब्यानं हा प्रकल्प साकारण्यात आला आहे.

सहकार दिन

आजच्या जागतिक सहकार दिनानिमित्त केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा, राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. सहकारामुळं ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत आणि स्थिर होत असल्यामुळं देशाचा आर्थिक विकासदर वाढण्यास मदत होत असल्याचं अमित शहा यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारी सहकार ही एक चळवळ आहे. शेती, उद्योग, पणन, बँकिंग या क्षेत्रात सहकारामुळं कष्टकरी वर्गाच्या प्रवेशाचा मार्ग सुकर झाला असल्याचं दिलीप वळसे पाटील यांनी सामाजिक प्रसारमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना आज त्यांच्या जयंती दिनानिमित्त आदरांजली वाहिली. डॉ. मुखर्जी यांनी मातृभूमीसाठी केलेला त्याग आणि बलिदान देशवासियांना प्रेरणा देत राहील, असं मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. डॉ.मुखर्जी यांनी देशाची एकता आणि अखंडतेसाठी लढा दिला. जनसंघाच्या स्थापनेतून देशाला आदर्शवादाची आणि 'राष्ट्र प्रथम' या विचारांची देणगी दिली, असं अमित शहा यांनी म्हटलं आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी दिल्लीतल्या भाजपा मुख्यालयात डॉ.मुखर्जी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली.

कांद्याची आवक

रब्बी हंगामातल्या कांद्याची बाजारातली आवक वाढत असल्यामुळे कांद्याचे दर स्थिर होत असल्याचं केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं सांगितलं. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कांद्याचं उत्पादन कमी होऊनही देशातल्या बाजारात कांद्याची पुरेशी उपलब्धता आहे. त्याचबरोबर यंदाच्या रब्बी हंगामात कांद्याचं अंदाजित उत्पादन १९१ लाख टन असून देशातल्या ग्राहकांची गरज भागवण्यासाठी ते पुरेसं आहे, अशी माहितीही या मंत्रालयानं दिली आहे. यंदा तीन लाख ६१ हजार हेक्टर परिसरात खरीपातल्या कांद्याची लागवड करायचं उद्दिष्ट असून ते गेल्या वर्षीपेक्षा १२ टक्के जास्त असेल. त्याचबरोबर खरीप हंगामात देशात दोन लाख ७२ हजार हेक्टरवर टोमॅटोची लागवड करण्याचं उद्दिष्ट असल्याचं कृषी मंत्रालयानं सांगितलं.

हवामान केंद्र

राज्यातल्या १० हजार गावांमध्ये मदत आणि पुनर्वसन विभाग, कृषी तसंच केंद्र शासनाच्या माध्यमातून हवामान केंद्रांची उभारणी करण्यात

येणार आहे, अशी माहिती कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात काल विधानसभेत दिली. महसूल मंडळ स्तरावरून हवामान केंद्र आता गावपातळीपर्यंत नेण्यात येणार आहेत, असं त्यांनी सांगितलं. यासंदर्भात सदस्य संजय सावकारे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत पृथ्वीराज चव्हाण, भास्कर जाधव, राजेश टोपे यांनी भाग घेतला.

नाना पटोले

दीक्षाभूमीशी कोट्यवधी लोकांच्या भावना जोडलेल्या आहेत. सरकार काही बांधकाम करत असेल आणि त्यामुळे आस्था आणि जनभावनेला धक्का लागत असेल तर विरोध होणारच. जनभावना आणि आस्था यांचा ताळमेळ ठेवून काम करावं, असा सल्ला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे. नागपूरमध्ये प्रसार माध्यमांशी संवाद साधताना ते आज बोलत होते. पुण्यात महिला वाहतूक पोलिसावर पेट्रोल ओतून जाळण्याचा प्रयत्न करण्यात आल्याच्या घटनेवर संताप व्यक्त करत पटोले यांनी राज्यात कायदा व्यवस्थेवर ताशेरे ओढले. शिवसेना खासदार रविंद्र वायकर यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप असताना मुंबई पोलिसांनी त्यांना क्लिन चीट देणे म्हणजे भाजपाच्या वॉशिंग मशीनमधून वायकरांना स्वच्छ केल्याचं आणखी एक प्रकरण आहे. मोदी सरकार हे ईडी आणि सीबीआय या दोन कार्यकर्त्यांच्यामार्फत राजकारण कसं करते, हे देशाने पाहिले आहे, असं पटोले यांनी म्हटलं आहे.

कामगार पालक दिन

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीनं स्थानिक पातळीवर एसटी कर्मचाऱ्यांच्या छोट्या-मोठया समस्या तात्काळ सोडविण्यासाठी विभाग नियंत्रक यांनी दर सोमवारी आणि शुक्रवारी विभागातल्या एका आगारात जाऊन 'कामगार पालक दिन' घ्यावा; ज्यामध्ये आगारातल्या

चालक- वाहक, यांत्रिक कर्मचारी आणि इतर कर्मचाऱ्यांच्या समस्या, तक्रारी ऐकून घेऊन तिथंच तातडीनं निराकरण करावं, अशा सूचना एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी एसटीच्या स्थानिक प्रशासनाला दिल्या आहेत. त्यानुसार १५ जुलै २०२४ पासून दुपारी ३ ते ५ या वेळेत 'कामगार पालक दिन' आयोजित करण्यात येणार आहे. एसटी महामंडळात सध्या सुमारे ९० हजार कर्मचारी आणि अधिकारी कार्यरत आहेत.

कृषी नेतृत्व पुरस्कार

१५ व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीचा २०२४ चा सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार महाराष्ट्राला जाहीर झाला आहे. भारताचे माजी सरन्यायाधीश आणि केरळचे राज्यपाल न्यायमूर्ती पी.सदाशिवम यांच्या अध्यक्षतेखालील पंधराव्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीनं ही घोषणा केली. नवी दिल्ली इथं येत्या १० जुलै रोजी होणाऱ्या सोहळ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हा पुरस्कार स्वीकारणार आहेत. या पुरस्कारासाठी समितीनं राज्यातील पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेतली असल्याचं राज्याच्या कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी म्हटलं आहे.

पीक स्पर्धा

नागपूर जिल्ह्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत असून शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करण्यात येत आहे. राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पीक स्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. 11 पिकांसाठी पीकस्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. पीक स्पर्धेसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख मूग आणि उडीद पिकासाठी 31 जुलै, तर भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या पिकांसाठी 31 ऑगस्ट आहे. या योजनेबाबत अधिक

माहितीसाठी कृषी विभागाचं केतस्थळ krishi.maharashtra.gov.in किंवा आपल्या नजीकच्या कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा किंवा संबंधित तालुका कृषी अधिकारी आणि उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

शिक्षक नियुक्ती

संपूर्ण राज्यात 1 जुलै 2024 पासून शाळा सुरू झाल्या आहेत. मात्र गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी-मोरगाव तालुक्याच्या केशोरी जिल्हा परिषद क्षेत्रांतर्गत येणाऱ्या वडेगाव-बंध्या जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेत दोनच शिक्षक असल्यानं शाळा सुरू होऊन देखील विद्यार्थ्यांचं शैक्षणिक नुकसान होत आहे. या शाळेत एकूण 1 ते 7 वर्ग असून 112 विद्यार्थी या शाळेत आहेत. विद्यार्थ्यांच्या पालकांनी आणि शाळा व्यवस्थापन समितीनं जिल्हा परिषदेविरुद्ध तीव्र नाराजी व्यक्त करून जोपर्यंत शाळेत शिक्षकांची नियुक्ती होत नाही, तोपर्यंत एकही विद्यार्थी शाळेत न पाठविण्याचा निर्णय पालकांनी आणि शाळा व्यवस्थापन समितीनं घेतला आहे.

गडचिरोली स्फोट

गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड तालुक्यातील धोडराज परिसरात नक्षलवाद्यांनी केलेल्या एका स्फोटात आज सकाळी २ जवान किरकोळ जखमी झाले. जवानांनी सतर्कता दाखवत नक्षल्यांचा मोठा घातपात करण्याचा प्रयत्न हाणून पाडला. या परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं.

'अक्षर पंढरी-अभंगांची अक्षरदिंडी'

विष्णूजी की रसोई, अक्षरायन आणि भूमिपात्र यांच्या संयुक्त वतीनं 'अक्षर पंढरी- अभंगांची अक्षरदिंडी' हा कार्यक्रम उद्या सकाळी 9 वाजता

विष्णूजी की रसोई, बजाज नगर, नागपूर इथं आयोजित करण्यात आला आहे. अक्षर,चित्र, कविता आणि अभंगांच्या रूपातील विठू माऊलीचं 'अक्षररूपी' दर्शन देणाऱ्या या कार्यक्रमाला वनराई फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.गिरीश गांधी, प्रसिद्ध व्हिज्युअल आर्टिस्ट विवेक रानडे आणि प्रसिद्ध लेखिका, दिग्दर्शिका मनिषा कोरडे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण

भंडारा जिल्ह्यात शाळाबाह्य, अनियमित आणि स्थलांतरित अशा 3 ते 18 वयोगटातील बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात दाखल करून त्यांचं शिक्षण अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. घरोघरी भेटी देवून बस स्थानक, रेल्वे स्थानक, फुटपाथ, सिग्नल, हॉटेल, खानावळी, सार्वजनिक ठिकाणे, बाजारतळ, वीटभट्टी, दगडखाणी, साखर कारखाने तसंच बालमजूर असण्याची शक्यता असलेल्या ठिकाणी शाळाबाहय मुलांचं सर्वेक्षण जिल्हा, तालुका, केंद्र, आणि गाव पातळीवर राबवण्यात येणार आहे. यासाठीचं सर्वेक्षण दि. 5 ते 20 जुलै 2024 दरम्यान राबविण्यात येत आहे.

*****